**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या बीड जिल्हयातील आष्टी, गेवराई, परळी वैजनाथ व माजलगाव तालुक्यातील २७ वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक २०/१२/२०२२ रोजी दू. १२:०० वा. डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

.......................................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या बीड जिल्हयातील आष्टी, गेवराई, परळी वैजनाथ व माजलगाव तालुक्यातील २७ प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक १२/१२/२०२२ रोजी दू. १२:०० वा. डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. राधाबिनोद शर्मा**भाप्रसे, : अध्यक्ष
जिल्हादंडाधिकारी, बीड.

२. **श्री. सो. म. कुरमूडे** : समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना.

बीड जिल्हयातील आष्टी, गेवराई, परळी वैजनाथ व माजलगाव तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या २७ वाळुघाटांच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली दि. २० डिसेंबर २०२२ रोजी दू. १२:०० वाजता डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आयोजित करण्यात आली होती.

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व

वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, बीड यांचा बीड जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १६/११/२०२२ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी डी. पी. डी. सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे असे नमूद केले. सदर बाबतची जाहीर सुचना दि. १९/११/२०२२ रोजीच्या दै. सकाळ (मराठी) व दि. २०/११/२०२२ रोजीच्या द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
- जिल्हा उदयोग केंद्र, बीड.
- जिल्हा परिषद, बीड.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय आष्टी, गेवराई, परळी वैजनाथ व माजलगाव.
- ग्रामपंचायत कार्यालय, तालूका- आष्टी -धिर्डी. तालूका- गेवराई –पाथरवाला खू., पांढरी, गोंदी खू., संगमजळगाव -२, सावरगाव नि., संगमजळगाव- १, हिंगनगाव- २, बोरगावथडी- २, हिंगनगाव- १, बोरगावथडी- १, राक्षसभूवन- २, राक्षसभूवन- १. तालूका-परळी वै.- डिग्रस- १, डिग्रस- २, डिग्रस- ३. तालूका- माजलगाव- सांडसचिचोली, मोगरा, सादोळा, खतगव्हाण- १, गव्हाणथडी, शूक्ल. निमगांव- १, गंगामसला-२, अडोळा, रिधोरी, कवडगावथडी, हिवरा बू- २.
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.
- (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन उप-प्रादेशिक कार्यालय जालना येथे तसेच इतर शासकीय कार्यालयामध्ये वाळूघाटाबाबत आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. परंतू लोकसूनावणी दरम्यान १. श्री. वैभव वगरे व इतर, शुक्लातिर्थ, ता. माजलगाव, जि. बीड. २. श्री. दिलीप वैजनाथ नाटकर व इतर, मौ. डिग्रस, ता. परळी, जि. बीड. ३. सरपंच ग्रामपंचायत मोगरा, मौ. मोगरा, ता. माजलगाव. जि. बीड. सदर सूचना/टिका इतिवृत्तामध्ये समाविष्ट करण्यात येवून सोबत जोडण्यात आले आहे. यानंतर त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथवा लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर त्यांनी सदर जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्षांच्या परवानगीने, प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार मे. राईटसोर्स इंडस्ट्रियल सोलूशन प्रा.लि. हैद्राबाद, तसेच श्री. तूळशिराम आरसूळ, जिल्हा खनिकर्म अधिकारी, बीड यांनी प्रकल्पाबददल तालूकानिहाय विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता. बीड जिल्हयातील आष्टी, गेवराई, परळी वैजनाथ व माजलगाव प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. कुदळ, फावडे, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. कूठल्याही मशिनरीचा वापर केला जाणार नाही. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. फक्त टॅक्टर ट्रॉली द्वारे नदीपात्रातून वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण

नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण समतोल राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. खाणीमध्ये काम करणा-यांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

तालुक्यातील वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**तालुका आष्टी-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | धिर्डी | ६ ते १०, ४६ ते ४८, ४१, ४२, ३७ ते ३९ | ३५०x३२x०.६ | १.१२ | २३७५ |

**तालुका गेवराई-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाथरवाला खू., | १,२,३,४ | ३४५x४०x०.५० | १.३८ | २४३८ |
| २ | पांढरी | १४६ ते १४९,१५१ ते १५३ | ३४८x४६x०.६० | १.६० | ३३९४ |
| ३ | गोंदी खू., | ३७,३८,४१,१ ते ४ | ६५०x५५x१.२० | ३.५८ | १५१५९ |
| ४ | संगमजळगाव -२ | २/१, ३ ते ५ | ७००x६०x१.२० | ४.२० | १७८०९ |
| ५ | सावरगाव नि. | २८ ते ३०, ३,४,१० | ७५०x४५x१.१० | ३.३८ | १३११८ |
| ६ | संगमजळगाव- १ | ३९,४०,४३,४५ | ७५०x५०x१.२० | ३.७५ | १५९०१ |
| ७ | हिंगनगाव- २ | ११ ते १५,१७ | ७९०x५०x१.६० | ३.९५ | २२३३२ |
| ८ | बोरगावथडी- २ | २,४ ते ९ | ८२२x५५x१.०० | ४.५२ | १५९७५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | हिंगनगाव- १ | ५२,५३,५४,२ | ९५०x५०x१.४० | ४.७५ | २३४९८ |
| १० | बोरगावथडी- १ | ४०,४१,४३,४६ ते ४८ | ९८०x४५x१.१० | ४.४१ | १७१४१ |
| ११ | राक्षसभूवन- २ | २७ ते ३०,३२ ते ३७ | १२००x३०x०.२० | ३.६० | २५४४ |
| १२ | राक्षसभूवन- १ | १८७ ते १९२,१९४,१९६,१९७ | १२४०x३५x१.२० | ४.३४ | १८४०३ |

## तालुका परळी वै.-

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | डिग्रस-१ | १० ते १२,१,२,२०,२१,२३,२९ | ५००x४५x२.१ | २.२५ | १६६९६ |
| २ | डिग्रस-२ | ३०,३५,३९,४०,४३,४४, ४७,४८,५१ ते ५७,६१,६० | ६५०x३५x२.१ | २.२७ | १६८८२ |
| ३ | डिग्रस-३ | ६२ ते ६६,६९, ते ७५,७९ | ५५०x३५x२.५ | १.९२ | १७००५ |

## तालुका माजलगाव -

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सांडसचिचोली | २१,१२,१२,२१,३२,१५,२१६ | २००x५०x०.४५ | १.०० | १५९० |
| २ | मोगरा | ३१५,३२७,३२८,३२९,३३४,१ | ७००x२५x०.७ | १.७५ | ४३२९ |
| ३ | सादोळा | २९ ते ३२,३९ ते ४१,६७,६८,७१ ते ७४,७६ | ७५०x३०x१ | २.२५ | ७९५१ |
| ४ | खतगव्हाण- १ | २८,३४,३६ ते ३८,४५,९९,१००,१०२ ते १०६,११२ ते ११८,१२३,१२४ | ७५०x५०x१.८ | ३.७५ | २३८५२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | गव्हाणथडी | ९ ते १८,२०,२१ | ८२०x५०x०.८ | ४.१० | ११५९० |
| ६ | शूक्ल. निमगांव-१ | ५ ते १०,१५,१६,१७,२०,२४,२५,२६ | १०००x३०x०.७ | ३.०० | ७४२० |
| ७ | गंगामसला-२ | १२,१४ ते १६,६५,६६,१८०,१७८,१७४,१७३ | १४००x३५x१.५ | ४.९० | २५९७२ |
| ८ | अडोळा | १ ते ४, ७२,७८ | ३५०x३५x१.० | १.२३ | ४३२९ |
| ९ | रिधोरी | १ ते ३,१५ ते १७,१७७ | ९००x५०x१.० | ४.५० | १५९०१ |
| १० | कवडगावथडी | १,२,४,५,३७ ते ३९,४२ | ६२०x५५x०.६ | ३.४१ | ७२३० |
| ११ | हिवरा बू- २ | ७६ ते ८०,३३ ते ३५,३९ ते ४२,५४ ते ५८ | १०००x४०x१.० | ४.०० | १४१३४ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान बीड जिल्हयातील गेवराई, माजलगाव, आष्टी, व परळी वैजनाथ तालुक्यातील सहभागी लोकांनी प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री. बाळासाहेब मुठाळ, रा. डिग्रस, ता. परळी वै., जि. बीड**
यांनी सांगितले की, वाळूची वाहतूक गावातून जाणा-या रस्त्यातून होते आणि रस्त्याच्या बाजूला शाळा व २ मंदिरे आहेत त्यामूळे वाहतूकीचा त्रास गावातील लोकांना होतो व रस्ता देखील खराब होतो. तसेच याबाबत पोलीस तक्रार देखील करण्यात आलेली आहे. त्यामूळे येथील वाळूघाटाचा लिलाव करण्यात येवू नये.

यावर श्री. हर्षद कांबळे, अधिकारी, खनिकर्म विभाग यांनी सांगितले की, गेल्या वर्षी जो लिलाव झाला होता त्याअनुषंगांने फक्त २ ते ३ दिवस सदरील घाटाचा वाळू

उपसा करण्यात आला. त्यामूळे वाहतूकीचा प्रश्न उपस्थित होतो की नाही याबाबत प्रश्न चिन्हच आहे. तसेच जर या वर्षी सदर घाटाचा वाळू लिलाव झाला नाही तर सदर घाटातून बेकायदेशीर व अनियमितपणे वाळू उपसा होण्याची संभावणा आहे ज्यामूळे सदर रस्त्याचा व वाहतूकीमूळे होणारा त्रास नाकारता येत नाही परंतू नियमानूसार लिलाव झाला तर सर्व नियम पाळून वाळू उपसा करण्यात येईल ज्यामूळे गावातील लोकांना त्रास होणार नाही.

२. **श्री. अभय पंडितराव मुठाळ, रा. डिग्रस, ता. परळी वै., जि. बीड**

यांनी सांगितले की, या भागातील पोहनेर बंधा-यामूळे नदीमध्ये १२ महिने पाणी असते तसेच वाळू वाहतूकीसाठी गावातूनच रस्ता असल्यामूळे सदरच्या घाटाचा लिलाव करण्यात येवू नये. तसेच अवैध वाळू उत्खनामूळे गावाच्या आसपास अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे.

यावर श्री. हर्षद कांबळे, अधिकारी, खनिकर्म विभाग यांनी सांगितले की, जर पाण्याची पातळी जास्त असेल तर वाळू उपसा करण्यात येणार नाही.

३. **श्री. भालचंद्र सोळंके, रा. गंगामसला., ता. माजलगाव, जि. बीड**

यांनी सांगितले की, गंगामसला गावाच्या बाजूस असलेल्या नदीच्या पात्रामध्ये मोरेश्वर मंदिर हे तिर्थ क्षेत्र आहे. वाळू उत्खनामूळे मंदिरास धोका निर्माण होईल. तसेच १२ महिने सदरील नदीपत्रामध्ये पाणी असते. तसेच याभागामध्ये अवैध उत्खनन होते त्यामूळे वाहतूकीची वर्दळ असते व अपघाताची श्यकता असते. त्यामूळे सदरील घाटाचा लिलाव करण्यात येवू नये.

४. **श्री. अरूण गोसावी, रा. मोगरा, ता. माजलगाव, जि. बीड.**

यांनी सांगितले की, मोगरा गावाच्या लगतच्या नदीपात्रातील वाळूघाटाचा लिलाव करण्यात येवू नये.

५. **श्री. मुंजाहरी ज्योतीराम खडूळ, रा. शुक्लतिर्थ लिमगाव, ता. माजलगाव, जि. बीड.**

यांनी सांगितले की, गावाच्या लगत असलेल्या नदीपात्रातील वाळूच्या उत्खनन व वाळू वाहतूकीमूळे अपघात होण्याची श्यकता आहे कारण शूक्लेश्वर मंदीर हे देवस्थान रस्त्याच्या बाजूस आहे तसेच रस्त्याच्या बाजूस वस्ती असल्यामूळे लहाण मूले व वृध्द

नागरिकांचा रस्त्यावर वावर असतो त्यामूळे अपघात होण्याची श्यकता आहे. तसेच तारगाव बंधा-यामूळे सदरच्या नदीपात्रात पाणी असते तरी सदरच्या वाळू घाटाचा लिलाव करण्यात येवू नये.

६. **श्री. नानासाहेब अजबे, धिर्डी, ता. आष्टी, जि. बीड.**
यांनी सांगितले की, धिर्डी गावालगतचा वाळूघाट लिलाव करण्यास हरकत नाही.

७. **श्री. सुंदर गोविंद तिवारी, पांढरी, ता. गेवराई, जि. बीड.**
यांनी सांगितले की, वाळू वाहतूकीमूळे गावातील रस्ता खराब होतो तसेच वर्दळ निर्माण होते त्यामूळे गावालगतचा लिलाव होवू नये. तसेच वाहतूकीमूळे हवेचे प्रदूषण देखील वाढते.

८. **श्री. सय्याद इब्राहीम, गोंदी खूर्द, ता. गेवराई, जि. बीड.**
यांनी सांगितले की, सदर वाळुघाट लिलाव करण्यास आक्षेप नाही

९. **श्री. महादेव सोळंके सावरगाव नि., ता. गेवराई, जि. बीड.**
यांनी सांगितले की, सदर वाळुघाट लिलाव करण्यास हरकत नाही.

१०. **श्री. त्रिंबक मदने, हिंगणगाव, ता. गेवराई, जि. बीड.**
यांनी सांगितले की, सदर वाळुघाट लिलाव करण्यास हरकत नाही.

११. **श्री. परसराम मिंड, बोरगावथडी, ता. गेवराई, जि. बीड.**
यांनी सांगितले की, सदर वाळुघाट लिलाव करण्यास हरकत नाही.

१२. **श्री. जयराम खेडकर, रा. शिरूर कासार, जि. बीड.**
यांनी सांगितले की, सदरील गावाच्या लगतच्या वाळू घाटामध्ये वाळू नसल्यामूळे सदरच्या घाटाचा लिलाव करण्यात येवू नये.

श्री. संतोष राऊत, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, बीड यांनी उपस्थित असलेल्या प्रत्येक वाळूघाटाच्या जवळच्या गावातील नागरिकांना उददेशून वाळू उत्खनाबाबत काही टिपा/टिप्पणी/आक्षेप असल्यास येथे तोंडी किंवा लिखीत स्वरूपात मांडावेत असे आव्हान केले.

श्री. उत्तम पाटील, अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांनी सर्वप्रथम पर्यावरण जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्ष मा. जिल्हादंडाधिकारी साहेब, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. व पूढे नागरिकांनी उपस्थित केलेल्या वाळूघाटाबाबतच्या वरील प्रश्नांना उत्तर देताना सांगितले की, वाळू घाटाचा लिलाव करण्याआधी सर्व वाळू घाटांचा शास्त्रोक्त पध्दतीने अभ्यास करण्यात आलेला आहे. तसेच विविध संबंधित शासकीय कार्यालयांमार्फत याबाबतचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे व त्यानंतरच सदरील घाटांची निश्चिती करण्यात आलेली आहे. तसेच शासनातर्फे वाळूचे उत्खनन करतेवेळी सर्वोतोपरी काळजी घेण्यात येईल जेणेकरून संबंधित गावातील लोकांना याचा त्रास होणार नाही. तसेच वाळू वाहतूकी दरम्यान होणा-या हवा, ध्वनी तसेच जल प्रदूषण रोखण्यासाठी नियमानूसार पूर्ण काळजी घेण्यात येईल. त्यामूळे गावातील लोकांना कूठलाही त्रास होणार नाही. तसेच वाळू उत्खनामूळे शासनास महसूल उपलब्द होणार आहे व नियमानूसार त्यातील काही भाग संबंधित गावातील विकासासाठी वापरण्यात येणार आहे. यासाठीचे प्रस्ताव ग्रांमपंचायीतीने जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. परंतू फक्त विरोध करणे हा उददेश ठेवून लिलावास विरोध करू नये, त्यामूळे अवैध वाळू उत्खनास व वाहतूकीस निर्बंध घालण्यात येईल.

मा. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी यांनी सदरच्या लोकसूनावणीचा समारोप करताना उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले की, जरी वाळूघाटास मंजूरी मिळून लिलाव झाला असेल तरी परंतू ठेकेदारास वाळूघाटाचे हस्तांतर करण्यापूर्वी संबंधित तहसिलदाराकडून पाणी पातळी विषयी अहवाल मागविण्यात येईल व पाणीपातळी विषयी शहानिशा करूनच ठेकेदारास वाळूघाट हस्तांतरीत करण्यात येईल. याबाबत ते व्ययक्तिक लक्ष घालणार आहेत. तसेच सूनावणी दरम्यान नागरिकांनी उपस्थित केलेल्या गावातील मंदिर, रस्ता वाहतूकीचे प्रश्न याबाबतची शासनाने नोंद घेतलेली आहे व पूढेही असे काही गावाचे नूकसान झाले असल्यास

ग्रामसभ्येमध्ये सभा घेवून तो जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यात यावा. यावर सविस्तर पाहणी करून झालेल्या नूकसानीची दूरूस्ती करण्यात येईल शासनाकडे याबाबत निधी उपलब्द आहे. तसेच वाळू उत्खनन व वाहतूकीमूळे उदभवना-या ध्वनी, हवा तसेच जल प्रदूषणाच्या प्रश्नाबाबत शासनातर्फे सर्वोतोपरी काळजी घेण्यात येईल. परंतू जर वाळू उत्खनास विरोधच केला तर जिल्हयातील विकास कांमावर याचा परिणाम होईल कारण जिल्हयातील रस्ते, इमारती, घरकूल योजना व इतर बांधकामे रखडले जातील. त्यामूळे वाळू उत्खनामूळे मिळणारा महसूलाबाबत विचार जरी काही कारणास्तव बाजूला ठेवला तरी एकंदरीत जिल्हयाच्या विकासावर याचा परिणाम होणार आहे. तसेच अवैधरित्या वाळू उपस्यावर नियंत्रण ठेवणे शासनास अवघड जाईल, तरी नागरिकांनी याबाबत सकारात्कम विचार करून वाळू उत्खनाबाबत सहमती दर्शवावी.

श्री. सो. म. कुरमुडे, यांनी उपस्थितांना विचारले की, आणखी कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे अध्यक्ष तसेच उपस्थितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणी अध्यक्ष्यांच्या परवानगीने संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**सो. म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, जालना.

**राधाबिनोद शर्मा**भाप्रसे,
(अध्यक्ष)
तथा
जिल्हादंडाधिकारी, बीड.